नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 28/01/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 22 कि.मी अंतरावर बिछवा येथे दिनांक 27/01/2021 ते दिनांक 10.30 वा दरम्यान फिर्यादी नामे– मुरलीधर मानिकराव ढोले, वय 45 वर्ष, रा. बिछवा व त्यांची पत्नी शेतात घराला कुलूप लावुन गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे मागचे दाराचे फटीमधुन हात टाकुन साखळी उघळुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने कपाटामधुन सोन्याचे दागीणे कि. 15,000/–रू., नगदी 15,000/– रू. असा एकुण किंमती 30,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री दिपक मानवटकर 965780153 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 12 कि.मी अंतरावर वग ता. कुही येथे दिनांक 01/01/2021 चे 14.00 वा. ते 20.00 दरम्यान फिर्यादी नामे– सौ. वनमाला हरीचंद्र तितरमारे, वय 48 वर्ष, रा. वग ता.कुही हि कुलदैवतेच्या पुजेसाठी मुळ गावी वग येथे आलेली असतांना ती कामात व्यस्त असल्याची संधी साधुन अज्ञात आरोपीने तिचे बॅगमधील 2.5 तोळयाचे मंगळसुत्र कि. 50,000/–रू., 3 ग्रॅम सोन्याची अंगठी कि. 7000/–रू. व नगदी 5,000/–रू. असा एकुण कि. 62,000/– रू. चा माल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री अनिल देरकर 8698052987 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. खापा :– दिनांक 27/01/2021 चे 16.00 वा. दरम्यान वय 33 वर्ष फिर्यादी/पीडित ही आपले काम आटोपून घराकडे एकटी पायदळ जात असतांना अज्ञात आरोपी हा मोटरसायकलने आला व त्याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 354 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री अजय मानकर 9422942764 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर